**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**

मध्यवर्ती कार्यालय, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८.

( दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२३०२३९००, फॅक्स क्रमांक :-०२२-२३०८६३५२ )

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केल्याप्रमाणे अधिकारी आणि पर्यवेक्षकीय पदांसाठी अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी सदर जाहिरातीत देण्यात आलेली माहिती, सूचना, अटी व शर्ती इ. काळजीपूर्वक वाचाव्यात.

## (१) भरावयाच्या पदांची सामाजिक आरक्षणानुसार संख्या

| गट | पदाचा सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | पदांची संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | वि.जा.व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| | | | | | अ | ब | क | ड | | | | |
| | | **अधिकारीवर्ग पदे** | | | | | | | | | | |
| | | **वर्ग-१** | | | | | | | | | | |
| अ | ०१ | परिव्यय लेखांकन अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | **वर्ग-२ (वरिष्ठ) /(कनिष्ठ)** | | | | | | | | | | |
| ब | ०२ | कनिष्ठ प्रक्रिया योजना अधिकारी | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | ०३ | उप यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक(यांत्रिक) (वरिष्ठ) | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| | | आगार व्यवस्थापक(यांत्रिक)/ सहाय्यक यंत्र अभियंता | १ | १ | ० | १ | १ | १ | ० | ७ | २० | ३२ |
| | ०४ | सहाय्यक /विभागीय भांडार अधिकारी | १ | २ | १ | ० | ० | ० | ० | २ | ३ | ८+१* |
| | ०५ | विभागीय अभियंता (स्थापत्य) | २ | ३ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | ९ |
| क | ०६ | विभागीय वाहतूक अधिकारी/ आगार व्यवस्थापक (वाहतूक) (वरिष्ठ) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | आगार व्यवस्थापक(वाहतूक)/ विभागीय वाहतूक अधिक्षक | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १६ | २० |
| | ०७ | सहाय्यक /विभागीय लेखा अधिकारी | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ६ | ११ |
| | ०८ | विभागीय सांख्यिक | ० | ३ | १ | ० | ० | ० | १ | २ | २ | ८+१* |
| | ०९ | सुरक्षा व दक्षता अधिकारी | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | ५ | ८ |
| | १० | सहाय्यक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १+१* |
| | ११ | कामगार अधिकारी | १ | ० | ० | १ | १ | ० | १ | ४ | ४ | ११+१* |
| | | एकूण | १० | १८ | ४ | ३ | २ | १ | २ | २२ | ५८ | १२० |
| | | **पर्यवेक्षकीय पदे -वर्ग-३ राज्यसंवर्ग** | | | | | | | | | | |
| ड | १२ | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ) | ९ | ० | १ | ३ | ३ | ० | १ | ११ | ३२ | ६० |
| | १३ | वरिष्ठ कार्यदेशक(कनिष्ठ) | ६ | २ | १ | १ | २ | १ | १ | ९ | १९ | ४२ |
| | | कनिष्ठ कार्यदेशक(कनिष्ठ) | ० | २ | १ | ० | १ | ० | १ | ४ | ७ | १६ |
| | | प्रभारक(कनिष्ठ) | ५ | ३ | २ | १ | २ | १ | १ | ९ | २० | ४४ |
| | १४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (कनिष्ठ) | ५ | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ०९ |
| | १५ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ) | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | २ | ०७ |
| इ | १६ | सहाय्यक वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ) | ६ | ४ | १ | १ | २ | ० | २ | १० | २३ | ४९ |
| | | वाहतूक निरीक्षक(कनिष्ठ) | ८ | ५ | ६ | २ | ५ | ३ | २ | ३८ | ५३ | १२२ |
| | १७ | लेखाकार(कनिष्ठ) | १५ | १४ | ७ | ४ | ६ | ३ | ४ | २० | ३२ | १०५ |
| | १८ | भांडार पर्यवेक्षक(कनिष्ठ) | ३ | १ | १ | ० | १ | ० | ० | ४ | ११ | २१ |
| | | भांडारपाल(कनिष्ठ) | २ | १ | २ | ० | १ | ० | १ | ३ | १० | २० |
| | १९ | सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ०४ |
| | | सहाय्यक सुरक्षा निरीक्षक(कनिष्ठ) | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ०७ |
| | २० | आगरक्षक(कनिष्ठ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ०२ |
| | | एकूण | ६६ | ३७ | २२ | १२ | २४ | ९ | १४ | ११२ | २१२ | ५०८ |

* उपरोक्त पदांपैकी सहा./विभा.भांडार अधिकारी-१, विभागीय सांख्यिक-१, सहा./विभा. कर्मचारीवर्ग अधिकारी-१, कामगार अधिकारी-१ ही पदे अपंगासाठी आरक्षित आहेत. त्याचा तपशिल पुढे देण्यात आला आहे.

वर दर्शविण्यात आलेल्या पदांपैकी तांत्रिक प्रवर्गातील व्यवसायनिहाय पदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पद | ट्रेड | | | | | | | | एकूण रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऑटो मेकॅनिक | बॉडी फिटर | टायर | बेंच फिटर | वेल्डर | पेंटीग | प्रिटींग | मशिनिस्ट | |
| १ | वरिष्ठ कार्यदेशक | ३१ | ०५ | ०४ | ०१ | -- | ०१ | -- | -- | ४२ |
| २ | कनिष्ठ कार्यदेशक | ०४ | ०३ | ०५ | ०१ | -- | ०१ | ०२ | -- | १६ |
| ३ | प्रभारक | १८ | १५ | ०८ | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ४४ |
| | एकूण | ५३ | २३ | १७ | ०३ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | १०२ |

## (२) <u>समांतर आरक्षण</u> :-

(अ) <u>महिलांसाठी आरक्षण</u> :- शासन नियमानुसार एकूण पदाच्या ३० टक्के इतके समांतर आरक्षण आहे.

(ब) <u>माजी सैनिक आरक्षण</u> :- शासन नियमानुसार एकूण पदाच्या१५टक्के इतके समांतर आरक्षण राहिल.

(क) <u>प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त आरक्षण</u> :- शासन निर्णयानुसार एकूण पदांच्या ५ टक्के इतके समांतर आरक्षण राहील (भुकंपग्रस्त ३ टक्के व प्रकल्पग्रस्त २टक्के) (सांकेतांक क्र.१ ते ११ अधिकारीवर्गाची पदे वगळून)

(ड) <u>अपंगाचे आरक्षण</u> :- अपंगाकरिता ३ टक्के आरक्षण असले तरी खालील पदे त्यासाठी दर्शविलेल्या अपंग प्रकारासाठी सुयोग्य म्हणून निश्चित केली आहेत. अंध /अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग या अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी १ टक्का आरक्षण आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सहा/विभा.भांडार अधिकारी | LV,PD,OL पात्र | विभागीय सांख्यिक | PD,OL,BL पात्र |
| सहा./विभा.कर्मचारीवर्ग अधिकारी | PS,PD,OL,OA पात्र | कामगार अधिकारी | LV/B,PD,OL,OAपात्र |

१. अंध /अल्पदृष्टी :- (<u>LV</u>-Low Vision(अल्पदृष्टी),<u>PS</u>-Partially sighted affected(अंशतःदृष्टीदोष)

२. कर्णबधीर :- <u>PD</u>-Partially Deaf(अंशतः कर्णबधीर),

३. अस्थिव्यंग :- <u>OL</u>-One Leg affected (एक पायाने अपंग), <u>BL</u>-Both Legs affected (दोन्ही पायांनी अपंग), <u>OA</u>-One Arm affected (एका हाताने अपंग)

उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधुन भरण्यात येतील तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातुन भरण्यात येते.

## (३) <u>शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता अनुभव व वेतनश्रेणी खालील प्रमाणे आहे</u>.

| अ. क्र | पदाचे नांव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता व इतर अटी व शर्ती |
|---|---|---|
| **(अ)** | **वर्ग-१** | |
| १ | परिव्यय लेखांकन अधिकारी<br>वेतनश्रेणी:रु.१२०००-३७५-१६५००<br>+ नियमानुसार मिळणारे इतर भते | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकीमधील (Mech./Auto.)प्रथम श्रेणीची पदवी + AICWA. या अर्हतेप्रमाणे पुरेसे अर्ज प्राप्त झाले नाही, तर वाणिज्य /विज्ञान यामधील प्रथम श्रेणीतील पदवीसह AICWA या शैक्षणिक अर्हतेचा विचार करण्यात येईल.<br>२) अनुभव - परिव्यय लेखांकन विषयात अर्हता प्राप्त केल्यानंतर नावाजलेल्या कारखान्यातील परिव्यय हिशोबासंबंधीचा तीन वर्षांचा अनुभव.<br>३) वयोमर्यादा - ३५ वर्षे, मागासवर्गीय उमेदवारास शासन निर्णयानुसार पाच वर्ष शिथीलक्षम. |

| | | |
|---|---|---|
| **(ब)** | **वर्ग-२ (वरिष्ठ)** | |
| २ | कनिष्ठ प्रक्रिया योजना अधिकारी<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.५१००-२००-७१००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.८५५०-२७५-१३५०० | १) बीएससी (कॉम्प्युटर) किंवा बीएससी (आयटी) किंवा बीसीएस मधील प्रथम श्रेणीची पदवी आवश्यक किंवा प्रथम श्रेणीची पदवी नसल्यास द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी आवश्यक.<br>२) अभियांत्रिकी पदवी, संगणकीय कुशलता, अद्यावत माहितीज्ञान, प्रकल्प संलग्नता ज्ञान असल्यास प्राधान्य |
| ३ | विभागीय वाहतूक अधिकारी/ आगार व्यवस्थापक (वाहतूक) (वरिष्ठ)<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.५१००-२००-७१००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.८५५०-२७५-१३५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यता प्राप्त विद्यापिठाची / संस्थेची वाहतूक व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक<br>३) निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नेमणूकीपासून २ वर्षाच्या कालावधीत अवजड वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ४ | उप यंत्र अभियंता/ आगार व्यवस्थापक (यांत्रिक) (वरिष्ठ)<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.५१००-२००-७१००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.८५५०-२७५-१३५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील ॲटोमोबाईल, प्रॉडक्शन, मॅकॅनिकल या शाखेतील प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यता प्राप्त विद्यापिठाची / संस्थेची वाहतूक व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक<br>३) निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नेमणूकीपासून २ वर्षाच्या कालावधीत अवजड वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| **(क)** | **वर्ग-२(कनिष्ठ)** | |
| ५ | आगार व्यवस्थापक (वाह)/ विभा.वाह. अधिक्षक<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची वाहतूक व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक<br>३) निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नेमणूकीपासून २ वर्षाच्या कालावधीत अवजड वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ६ | आगार व्यवस्थापक(यां)/ सहा.यंत्र अभियंता<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील ॲटोमोबाईल, प्रॉडक्शन, मॅकॅनिकल या शाखेतील प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची वाहतूक व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक<br>३) निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नेमणूकीपासून २ वर्षाच्या कालावधीत अवजड वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त करावा लागेल. |

| | | |
|---|---|---|
| ७ | सहाय्यक/विभागीय लेखा अधिकारी<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी (Accountancy & Auditing या मुख्य विषयासह), अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची वित्तीय व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) असल्यास प्राधान्य |
| ८ | सहाय्यक/विभागीय भांडार अधिकारी<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील ॲटोमोबाईल, प्रॉडक्शन, शाखेतील प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची व्यवसाय प्रशासनाची (मटेरियल/ प्रॉडक्शन) द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक |
| ९ | विभागीय अभियंता(स्था)<br>अ) प्रथम ३वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) कोणत्याही प्रतिष्ठीत व्यवसायीक संस्थेतील स्थापत्य, इमारत बांधकाम, देखभाल व रस्ते बांधणीच्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| १० | विभागीय सांख्यिक<br>अ) प्रथम ३वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Statistics या मुख्य विषयासह) प्रथम श्रेणीची पदवी किंवा समग्र सांख्यिकीमधील द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची/ संस्थेची वाहतूक व्यवस्थापन किंवा व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) असल्यास प्राधान्य दिले जाईल |
| ११ | सुरक्षा व दक्षता अधिकारी<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी किंवा औद्योगिक सुरक्षा कोर्स प्रथम श्रेणी, अधिक<br>२) निकोप प्रकृती असावी, ३) किमान उंची १६७ सें.मी. (५ फूट ६ इंच ) व महिला उमेदवारांबाबत ५ फूट ३ इंचपेक्षा कमी नसावी.<br>४) कोणत्याही औद्योगिक व्यवसाय संस्थेच्या किंवा सरकारी सुरक्षा शाखेतील पर्यवेक्षकीय किंवा त्यावरील संवर्गात किमान २ वर्षे नोकरी केली असल्यास किंवा माजी सैनिक असल्यास प्राधान्य. |
| १२ | सहाय्यक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी<br>अ) प्रथम ३ वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी: रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी: रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची व्यवसाय प्रशासन (MBA)/कर्मचारीवर्ग व्यवस्थापन (MPM) / समाजकार्य व्यवस्थापन (MSW) (कामगार कल्याण व कर्मचारीवर्ग व्यवस्थापन या प्रमुख विषयासह) द्वितीय श्रेणीतील पदविका आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| १३ | कामगार अधिकारी<br>अ)प्रथम ३वर्षाकरिता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.४४५०-१७५-६२००<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी:<br>रु.७४५०-२२५-११५०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची प्रथम श्रेणीची पदवी किंवा द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, अधिक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाची/संस्थेची समाजकार्य व्यवस्थापन (MSW/MLW)(कामगारकल्याण व समाजकल्याण विषया-सह) किंवा कामगार विज्ञान पदव्युत्तर कोर्स (MLS)/व्यवसाय प्रशासनाची द्वितीय श्रेणीतील पदवी (MBA) आवश्यक |
| **(ड)** | **वर्ग-३(पर्यवेक्षकीय): राज्यसंवर्ग** | |
| १४ | सहा.वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ)<br>अ)प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२६४०-९०-३५४०.<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)व्यवस्थापन शास्त्रातील पदवी/पदविकाधारकांना अधिक पसंती<br>३) शारिरीक पात्रता :- उंची १६३ सें.मी.(किमान) (महिला उमेदवारांसाठी उंची १५३ सें.मी.)<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक |
| १५ | वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ)<br>अ)प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)व्यवस्थापन शास्त्रातील पदवी/पदविकाधारकांना अधिक पसंती<br>३) शारिरीक पात्रता :- उंची -१६३ सें.मी.( किमान ) (महिला उमेदवारांसाठी उंची १५३ सें.मी.)<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून २ वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक |
| १६ | सहा.कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ)/ तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ)<br>अ)प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२६४०-९०-३५४०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (तीन वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>३) रा.प. महामंडळामध्ये रुजू झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक |
| १७ | वरिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ)<br>अ)प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२७००-१०५-३७५०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.४५००-१७५-७३००-१८५-८२२५-१९५-१०९५५ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>३) रा. प. महामंडळामध्ये रुजू झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक<br>४) उमेदवारांनी संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट) उत्तीर्ण होणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| १८ | कनिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु. २६४०-९०-३५४०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकी मधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (तीन वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकी मधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>३) रा. प. महामंडळामध्ये रुजू झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक<br>४) उमेदवारांनी संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट ) उत्तीर्ण होणे आवश्यक |
| १९ | प्रभारक (कनिष्ठ)<br>अ)प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकी मधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकी मधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>३) रा. प. महामंडळामध्ये रुजू झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक<br>४) उमेदवारांनी संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट ) उत्तीर्ण होणे आवश्यक |
| २० | लेखाकार (कनिष्ठ) /<br>कनिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य विषयातील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) व्यवस्थापन शास्त्रातील पदवी / पदविका धारकांना अधिक पंसती.<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासन मान्य संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| २१ | भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ) /<br>वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.२६४०-९०-३५४०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य विषयातील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) व्यवस्थापन शास्त्रातील पदवी / पदविका धारकांना अधिक पंसती.<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासन मान्य संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| २२ | भांडारपाल (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य विषयातील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) व्यवस्थापन शास्त्रातील पदवी /पदविका धारकांना अधिक पंसती.<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.'' / तत्सम शासन मान्य संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| २३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.२६४०-९०-३५४०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.४४००-१५०-६५००-१७५-७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) स्थापत्य अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३वर्षे मुदतीची) असणे आवश्यक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विषयामधील पदवीधारकास अधिक पसंती. |

| | | |
|---|---|---|
| २४ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु. २६४०-९०-३५४०<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.४४००-१५०-६५००-१७५-<br>७५५०-१८५-९४००-१९५-१०३७५ | १) विद्युत अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३वर्षे मुदतीची) असणे आवश्यक<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवीधारकास अधिक पसंती. |
| २५ | सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-<br>६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) कायदेविषयक ज्ञान हे अतिरिक्त अर्हता म्हणून समजण्यात येईल.<br>३) माजी सैनिक/पोलीस यांना प्राधान्य<br>४) शारिरीक पात्रता :- उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १५५ से.मी.), छाती ७८ सें.मी. (पुरुष उमेदवारांसाठी )<br>५) शारिरीक क्षमतेची चाचणी:-<br>१) ५ मिनिटात १ कि.मी.धावणे.<br>२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून(ॲस्ट्राइड)१०उडया मारणे |
| २६ | सहा.सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.१७४०-३५-१९१५-४०-२११५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.२९००-७५-३६५०-८५-४५००-<br>१००-६००० | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) शारिरीक पात्रता :- उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १५५ से.मी.), छाती ७८ सें.मी. (पुरुष उमेदवारांसाठी )<br>३) शारिरीक क्षमतेची चाचणी:-<br>१) ५ मिनिटात १ कि.मी.धावणे.<br>२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून(ॲस्ट्राइड)१०उडया मारणे |
| २७ | आगरक्षक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३वर्षाकरीता कनिष्ठ वेतनश्रेणी.<br>रु.२३४०-७५-२७१५-९०-३१६५<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.३९००-१२५-४५२५-१५०-<br>६६२५-१७५-८३७५-१८५-९४८५ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त शासकिय संस्थेची अग्नीक्षमनाची पदवीका आवश्यक.<br>३) ''२'' मधील अर्हतेशी समकक्ष सेनादलाची अर्हता असणा-या माजी सैनिकांना अधिक पसंती.<br>४) शारिरीक पात्रता :-उंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १५५ से.मी.) छाती ७८ सें.मी. न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी)<br>५) शारिरीक क्षमतेची चाचणी.<br>१) ५ मिनिटात १ कि.मी.धावणे.<br>२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशरितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून(ॲस्ट्राइड)१० उडया मारणे |

**महत्वाच्या तारखा व माहिती :-**

**१. वरील सर्व पदांसाठी उमेदवारांनी त्यांचे अर्ज ''पोस्ट बॅग नं. ० २, व्दारा सब पोस्ट मास्टर, शिवाजी नगर , पुणे ४११००५'' येथे साध्या पोस्टाने पाठवावेत.**

**२. अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक : १९/०९/२००९**

**३. लेखी परीक्षेचा कार्यक्रम उमेदवारांना टपालाव्दारे प्रवेशपत्र पाठवून कळविण्यात येईल**

## (४) अधिकारीवर्ग पदांसाठी इतर अटी व शर्ती

**अ) वयोमर्यादा**:-परिव्यय लेखांकन अधिकारी पदासाठी दिनांक १४ ऑगस्ट,२००९ रोजी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे इतर सर्व अधिकारी वर्ग-२(कनिष्ठ)/(वरिष्ठ) पदाच्या उमेदवारांकरीता दिनांक१४ ऑगस्ट, २००९ रोजी किमान वयोमर्यादा २१ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे. शासकीय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये ५ वर्षे शिथीलता राहील, अपंग उमेदवार व माजी सैनिकांसाठी शासन नियमानुसार वयात शिथिलता राहील. कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

**ब) करारनामा** : निवड झालेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळात (प्रशिक्षण कालावधी सोडून) किमान ५ वर्षे सेवा करण्याबाबत महामंडळाने विहीत केलेला करारनामा रु.१००/- किंमत असलेल्या मुद्रांकपत्रावर (Bond Paper) करुन द्यावा लागेल. कराराच्या मुदतीपूर्वी नोकरी सोडल्यास प्रशिक्षण कालावधीत देण्यात आलेल्या विद्यावेतनातील/ नेमणूक दिल्यानंतर देण्यात आलेल्या वेतनातील आवश्यक त्या प्रमाणात रक्कम वसूल करण्यात येईल.

**क)** लेखी परीक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ राहील व ती २०० गुणांची दोन तास कालावधीची असेल. लेखी परीक्षेतील गुणांना ९० टक्के भारांक व मुलाखतीतील गुणांना १० टक्के भारांक देऊन गुणानुसार गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. पद सांकेतांक क्रमांक ३ व ६ मध्ये एकापेक्षा जास्त पदे असल्याने त्या पदांकरीता अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांची निवड ही सामाईक (कॉमन)गुणवत्तेप्रमाणे करण्यात येईल. म्हणजे जास्त गुण मिळविलेल्या उमेदवारांची संबंधित प्रवर्गातील वरिष्ठ पदाकरीता निवड होईल व कमी गुण मिळविलेले त्यांची त्यापेक्षा कनिष्ठ पदावर निवड होईल.

**ड)** लेखी परीक्षेतील गुणानुक्रमानुसार घोषित जागांच्या१:३प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल

## ५) पर्यवेक्षकीय पदांसाठी इतर अटी व शर्ती

**अ) वयोमर्यादा** :- पर्यवेक्षकीय पदाच्या उमेदवारांकरीता दिनांक१४ ऑगस्ट,२००९ रोजी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे. शासकीय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये ५वर्षे शिथीलता राहील व माजी-सैनिकांसाठी शासन निर्णयानुसार वयात शिथिलता राहील, कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

**ब)** वरिष्ठ कार्यदेशक (क), कनिष्ठ कार्यदेशक (क) व प्रभारक (क) या पदांसाठी लेखी परीक्षेतील गुणानुक्रमानुसार घोषित जागांच्या १:३ प्रमाणात उमेदवारांना व्यवसाय चाचणीसाठी (ट्रेड टेस्ट) बोलविण्यात येईल. व्यवसाय चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**क)** सुरक्षा निरीक्षक (क) व सहा.सुरक्षा निरीक्षक (क) या पदांसाठी लेखी परीक्षेतील गुणानुक्रमानुसार घोषित जागांच्या १:३ या प्रमाणात उमेदवारांना शारिरीक क्षमतेच्या चाचणीसाठी बोलविण्यात येईल. शारिरीक क्षमतेच्या चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**ड)** वरील ''ब व क'' मधील पदे वगळून उर्वरित पदांसाठी लेखी परीक्षेतील गुणानुक्रमानुसार घोषित जागांच्या १:३ प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**ई)** लेखी परीक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ राहील व ती २०० गुणांची दोन तास कालावधीची असेल. लेखी परीक्षेतील गुणांना ९० टक्के भारांक व मुलाखतीतील गुणांना १० टक्के भारांक देऊन गुणानुसार गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. पद सांकेतांक क्रमांक १३,१६,१८ व १९ मध्ये एकापेक्षा जास्त पदे असल्याने त्या पदांकरीता अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांची निवड ही सामाईक (कॉमन) गुणवत्तेप्रमाणे करण्यात येईल. म्हणजे जास्त गुण मिळविलेल्या उमेदवारांची संबंधित प्रवर्गातील वरिष्ठ पदाकरीता निवड होईल व कमी गुण मिळविलेले त्यांची त्यापेक्षा कनिष्ठ पदावर निवड होईल.

## ६) सर्व पदांसाठी इतर अटी व शर्ती

**अ)** जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे ज्या उमेदवारांचे विहीत नमुन्यातील सर्व माहिती भरलेले परिपूर्ण अर्ज पूर्ण परिक्षा-शुल्कासह विहीत मुदतीत प्राप्त झालेले असतील अशा अर्जदारांना अर्जाची छाननी न करता लेखी परीक्षेसाठी बोलविण्यात येईल. लेखी परीक्षा, अर्जाच्या छाननीशिवाय घेण्यात येणार असल्यामुळे अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते आवेदीत पदाच्या सर्व अटी व शर्ती पूर्ण करतात. जर निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर असे दिसुन आले की, उमेदवार पात्रतेचा निकष पूर्ण करीत नाही, तर त्याची / तिची उमेदवारी / नेमणूक तात्काळ विना-नोटीस रद्द करण्यात येईल.

**ब)** लेखी परीक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ राहील. त्यामध्ये सामान्य ज्ञान, संख्याविषयक योग्यता चांचणी, तर्कशक्ती, विश्लेषणात्मक विचाराची क्षमता, निर्णय क्षमता व गती, व्यावसायीक कल, इत्यादी बाबींतील विषयांचा समावेश असेल. या बाबतचा तपशील लेखी परिक्षेस बोलाविताना उमेदवारांना पाठविण्यात येईल.

**क)** वरील पदांसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना तीन महिने नेमणूकपूर्व प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांच्या नेमणूकीकरिता विचार करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीत अधिकारी प्रवर्गातील उमेदवारांना रु.४०००/- प्रतिमहा व पर्यवेक्षकीय प्रवर्गातील उमेदवारांना रु.३०००/- प्रतिमहा इतके ठोस (Fixed) विद्यावेतन दिले जाईल. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये क्लासरुम प्रशिक्षणासह प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणाचा (On the job Training) समावेश असेल.

**ड)** ३ महिन्याचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना वर दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीत त्या त्या पदावर पहिल्या ३ वर्षांकरीता नेमणूक देण्यात येईल. नियमानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता व इतर भत्ते मिळतील व परिविक्षा कालावधी २ वर्षांचा राहील. २ वर्षांचा परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण झाल्यास त्यांना स्थायी करण्यात येईल व कनिष्ठ वेतनश्रेणीत ३ वर्षे पूर्ण झाल्यावर वर दर्शविण्यात आलेल्या नियमित वेतनश्रेणीत नियम / अटींच्या अधीन सामावून घेण्यात येईल. त्याप्रमाणे त्या त्या वेळी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता + इतर भत्ते इ.अनुज्ञेय राहील. परिव्यय लेखांकन अधिकारी या पदास कनिष्ठ वेतनश्रेणीची अट लागू नाही.

**ई)** उमेदवारास मराठी बोलता, वाचता व लिहीता येणे आवश्यक.

**फ)** सर्व पदांकरीता उमेदवारांना संगणकाचे ज्ञान आवश्यक.

## ७) महत्वाच्या सूचना :-

१. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि राखीव पदे बदलण्यासापेक्ष आहेत.

२. अर्ज विहीत नमुन्यात सर्वदृष्टीने पूर्ण असावेत. अर्जाचा नमूना पुढे देण्यात आला आहे.

३. शासकीय,निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेत असलेल्या एखाद्या अर्जदाराला वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज करावयाचा असेल, तर त्याने/ तीने त्याच्या / तिच्या खात्याचे "**ना हरकत प्रमाणपत्र**" (No Objection Certificate) सोबत जोडून विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्यांचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.

४. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै, २००५ महाराष्ट्र नागरी सेवा (**लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन**) नियम,२००५ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार उमेदवाराने अर्जासोबत प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

५. सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी / समाज कल्याण अधिकारी / इतर अधिकृत संस्था यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज आवश्यक त्या शुल्कासह जाहिरातीत दिलेल्या पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे.

६. कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता नाकारणे वा स्विकारणे किंवा सदर जाहिरात पुर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

७. अलीकडच्या काळात काढलेले पारपत्र आकाराचे स्वत:चे छायाचित्र स्वत:च्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

८. **उमेदवाराने परीक्षा शुल्क म्हणून रु.२५०/- खुल्या प्रवर्गासाठी व रु.१५० मागासवर्गीयांसाठी. "M.S.R.T.Corporation Fund Account" यांचे नावे काढलेला व मुंबईत अधिदानीत होणारा बँकेचा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. परीक्षा शुल्क इतर कोणत्याही स्वरुपात स्विकारला जाणार नाही. डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवाराने त्याचे नाव व पत्ता इंग्रजी भाषेमध्ये ठळक अक्षरात आणि पदाचे नाव लिहिणे अत्यंत आवश्यक आहे.**

९. भरावयाच्या पदांचे एकुण ५ गट असून त्यांची पद सांकेतीक क्र.१ ते २० असे आहेत. उमेदवारास एका पेक्षा जास्त सांकेतीक क्रमांकापुढील पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, प्रत्येक सांकेतीक क्रमांकासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे . (२५० रु./ १५० रु. डिमांड ड्राफ्ट) परीक्षेचे स्थळ, वेळ व दिनांक नंतर कळविण्यात येईल.
उमेदवाराने एकापेक्षा जास्त सांकेतीक क्रमांकापुढील पदांसाठी अर्ज केले असल्यास उमेदवाराने लेखी परीक्षेत मिळविलेले गुण इतर उमेदवारांच्या बरोबर त्या त्या पदांसाठी विचारात घेतले जातील.

१०. वरील पदांचे लेखी परीक्षेसाठी पद सांकेतांक क्रमांकानुसार खालीलप्रमाणे ५ गट करण्यात आले असून प्रत्येक गटासाठी एक लेखी परीक्षा घेण्यात येईल.

अ) पद सांकेतांक क्रमांक :- ०१

ब) पद सांकेतांक क्रमांक :- ०२,०३,०४,०५

क) पद सांकेतांक क्रमांक :- ०६,०७,०८,०९,१०,११

ड) पद सांकेतांक क्रमांक :- १२,१३,१४,१५

इ) पद सांकेतांक क्रमांक :- १६,१७,१८,१९,२०

११. उमेदवाराने पाठविलेली परीक्षा शुल्काची रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१२. इच्छुक उमेदवाराने सोबतच्या नमुन्यात आपले परिपूर्ण अर्ज एकाच बाजुने जाड कागदावर टंकलिखित (A-4 आकाराच्या कागदावर) करुन पाकीटावर ठळक अक्षरात ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा सांकेतांक क्रमांक नमुद करावा, स्वतंत्र सांकेतांक क्रमांकासाठी स्वतंत्र लिफाफ्यात अर्ज पाठवावा.

१३. उमेदवारांच्या अर्जाची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराने अर्ज भरण्यापुर्वी दिलेल्या सुचना काटेकोरपणे वाचणे आवश्यक आहे. तसेच संपूर्ण नाव (क्र.१-अ ), पत्र-व्यवहाराचा पत्ता (क्र.१-ब) आणि जन्म दिनांक (क्र.४) ही माहिती इंग्रजी मोठया अक्षरात / अंकात लिहिणे अनिवार्य आहे.

१४. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पोष्टाच्या पिनकोडसह व्यवस्थित असणे आवश्यक.

१५. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका, प्रतिज्ञापन तसेच जाती प्रमाणपत्र व जाती प्रमाणपत्राचा वैधता दाखला प्राप्त केला असल्यास त्याच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चा पत्ता पिनकोड सह असलेला रुपये १०चे पोष्टाचे तिकीट लावलेला २८ X १२ से. मी. आकाराचा लिफाफा जोडणे आवश्यक आहे.

१६. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहीत मुदतीत वर नमूद केलेल्या पोष्ट बॅग क्रमांकावर विहीत वेळेत प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झाले तर असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१७. पोष्टाच्या विलंबामुळे अर्ज प्राप्त होण्यास किंवा उमेदवारास पत्र मिळण्यास विलंब झाला, तर त्याची जबाबदारी रा.प.महामंडळावर राहाणार नाही.

१८. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९. निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण / परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास पुढील नेमणूका नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील.

२०. निवड झालेल्या व प्रशिक्षण पूर्ण करणा-या उमेदवारांची रा.प.महामंडळातील राज्यातील कोणत्याही विभाग / घटक / प्रदेशात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा रा.प.महामंडळातील कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य असेल.

२१. निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील.

**२२.** निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**२३.** विजाअ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे.

**२४.** इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्र ( **Non creamylayer Certificate**) सादर केले असेल तरच मिळू शकेल. इमाव, भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ हा त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध प्रमाणपत्र ( **Non creamylayer Certificate**) सादर केले असेल तरच मिळू शकेल.

**२५.** निवड झालेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना नेमणूक देण्यात येईल. वैधता सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित उमेदवाराची राहील.

**२६.** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग उमेदवारांची नियुक्ती ही जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासापेक्ष असेल. या प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांनी जात पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देता येणार नाही. कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहील.

**२७.** रा.प.महामंडळाने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे / स्विकारणे इ. चा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**२८.** जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला / तिला निवड प्रक्रियेतून तात्काळ बाद करण्यात येईल.

***************

**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.),**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मुंबई - ८**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

### अर्जाचा नमूना

| उमेदवाराने त्याचे. अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून त्यावर स्वाक्षरी करावी<br>२.५ से.मी. X ३ से.मी |
|---|
| उमेदवाराची स्वाक्षरी |

( * खालील माहिती अर्जाच्या लिफाफ्यावर लिहीणे आवश्यक आहे )

पदाचे नाव :--------------------------------

* पदाचा सांकेतांक क्र. [ ] [ ]

१) (अ) संपुर्ण नांव (आडनाव प्रथम) : (नावाच्या भागामध्ये एक जागा सोडण्यात यावी )

Shri/Smt./Kum. (फक्त इंग्रजी ठळक अक्षरात)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

श्री./श्रीमती /कुमारी (फक्त मराठी ठळक अक्षरात)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(ब) पत्रव्यहाराचा पत्ता : (फक्त इंग्रजी ठळक अक्षरात)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ता | लु | का | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| जि | ल्हा | | | | | | | | | | | | | पि | न | को | ड | नं. | - | | | | | | | | | |

(पिन कोड क्रमांक आवश्यक आहे)

(क) वडिलांचे / पतीचे संपुर्ण नांव

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२) उमेदवाराचा जाती प्रवर्ग : (योग्य त्या ठिकाणी √ असे चिन्ह करा)

| अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

३) उमेदवार कोणत्या गटात मोडतो.:- (योग्य त्या ठिकाणी √ असे चिन्ह करा)

☐ अपंग, ☐ माजी सैनिक, ☐ महिला, ☐ प्रकल्पग्रस्त/ ☐ भुकंपग्रस्त, इतर असल्यास प्रमाणपत्र सादर करावे.

(अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे)

४) जन्म दिनांक : [दिनांक ☐☐] [महिना ☐☐] [वर्ष ☐☐☐☐] दिनांक :- १४-०८- २००९ रोजीचे वय [वर्ष ☐☐] [महिने ☐☐]

५) परिक्षा शुल्क भरल्याचा तपशील

| बॅकेचे नाव ,पत्ता व शाखा | डिमांड ड्रापटचा क्र.व तारीख | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| | | |

६) शैक्षणिक अर्हता : -

| विद्यापिठाचे/ संस्थेचे नांव | प्राप्त केलेली पदवी / पदविका | वर्ष | वर्ग | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

संगणकीय ज्ञान :------------------------------------ इतर ---------------------

७) अनुभव (असल्यास)-----------------------------------------------------------

८) सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी पत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक--------------

९) रा.प. महामंडळाच्या सेवेत तुमचा कोणी नातेवाईक काम करीत आहे कां?------------
(असल्यास त्याचा तपशिल द्यावा)

१०) आपण रा.प.महामंडळाच्या कोणत्याही खात्यात काम करीत आहात का?------------
काम केले आहे कां? ---------------------------------(असल्यास त्याबाबतचा तपशिल नमुद करावा.)

११) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांने एका पदाव्यतिरिक्त इतर पदांसाठी अर्ज केला असल्यास पदाचे नाव व पद सांकेतांक (१)-------[ | ] (२)------[ | ](३)--------[ | ]

१२) उमेदवारास पुर्वी शिक्षा झाली होती कां? झाली असल्यास त्याचा तपशिल नमुद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणीत प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी----------------

१३) उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी न्यायालीयन प्रकरण प्रलंबित व प्रस्तावित आहे कां? असल्यास त्याबाबतचा तपशिल द्यावा------------------------------------------------

१४) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशिल देवून सद्याच्या नियुक्ती प्राधिकरणाचे ''ना हरकत प्रमाणपत्र'' जोडावे-----------------------

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/ करते की, वरील माहिती जाणिवपूर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेले सर्व निकष व शैक्षणिक अर्हतेनुसार मी अर्ज सादर करण्यास पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज रद्द ठरण्यास किंवा नेमणूक झाली असल्यास ती रद्द होण्यास व कारवाईस पात्र राहीन याची मी जाणिवपूर्वक नोंद घेतली आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

सोबत : प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती

डिमांड ड्राफ्ट ( संपूर्ण नाव :- श्री/श्रीमती/कुमारी--------------)

दिनांक------------

---------------------------------------------------------------------------------------------

महाराष्ट्र नागरी सेवा (**लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन**) नियम, २००५ नुसार

**(नमुना - अ)**

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री. / श्रीमती /कुमारी ---------------------------------------------------
श्री. ------------------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ------------ वर्षे, राहणार--------------------------------------------- यांव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला -------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे.(असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या , मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : सही